# म.आ.पोदार रुग्णालय
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ.ॲनी बेझंट रोड,वरळी, मुंबई-४०० ०१८
GOVERNMENT OF MAHARASHTRA
M.A.PODAR HOSPITAL
Office of the Dean,Dr.A.B.Road,Worli, Mumbai-400018
दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९३३५३३ Tel no.022-24933533 email :deanmaph@gmail.com


जा.क्र.मआपोरु/आस्था/अध्यापकेत्तर पदे/कंत्राटी/ 1384 /२०२४ दिनांक : 14 MAR 2024

## कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत
## (Walk in Interview)

संदर्भ:- १) शा.नि. वै.शि.वऔ.द्र.वि.क्र.आयुसे-११२०/प्र.क्र.८९/आयु-१, दि.०७ सप्टेंबर,२०२२.

२) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष यांचे पत्र क्र.आसंमु/आस्था/अध्यापकेत्तर पदे/कंत्राटी/नियुक्ती/२०२४/आयु-३/२२०४, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने म.आ.पोदार रुग्णालय, वरळी, मुंबई येथील मंजूर झालेल्या पंचकर्म वैद्य (स्त्री) तसेच अपघात वैद्यकीय अधिकारी या पदांवर संदर्भित शासन निर्णयातील तरतूदींनुसार कार्यवाही करुन सदर पदांवर नियुक्ती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने ११ महिन्यांच्या कालावधीकरीता कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी विहित अटी व शर्तींची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती (Walk in Interview) आयोजित करण्यात येत आहेत.

तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | उपलब्ध पदे |
|---|---|---|
| १. | पंचकर्म वैद्य (स्त्री) | ०१ |
| २ | अपघात वैद्यकीय अधिकारी (एस-१६) | ०४ |

टिप:- मुलाखतीच्या दिवसांपर्यंत/ रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा बदलीने संबंधीत पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या संबंधीत पदासाठी करार पध्दतीवरील संबंधीत उमेदवाराचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष मुलाखतीचे स्थळ :-<br>दिनांक व वेळ :- | मा.अधिष्ठाता यांचे दालन, रुग्णालय इमारत, तळमजला. म.आ.पोदार रुग्णालय, वरळी, मुंबई १८.<br>दिनांक ०४.०४.२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | : | **पंचकर्म वैद्य (स्त्री)** |
| वयोमर्यादा | : | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत<br>(परंतु उमेदवाराच्या वयाचे ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिन्याचा सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक आहे. ) |
| आवश्यक शैक्षणिक अर्हता | : | १) भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषदेच्या मान्यता प्राप्त विद्यापीठातून/महाविद्यालयातून बी.ए.एम.एस. पदवीधारक असावा.<br>२) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन (MCIM) चे नोंदणी (रजिस्ट्रेशन) आवश्यक.<br>३) एम.एम.पी.ॲक्ट १९६१ मधील भाग अे, अे-१, बी, किंवा सी अर्हता आवश्यक.<br>४) संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहिण्यास, बोलण्यास व वाचण्यास उमेदवार समर्थ असला पाहिजे. |
| प्राधान्य | : | १) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली **पंचकर्म** विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br>२) शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर पंचकर्म विषयातील १ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य राहील. |
| मानधन | : | १) प्रतिमाह मानधन रुपये ५०,०००/- ( या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | : | **अपघात वैद्यकीय अधिकारी (एस-१६)** |
| वयोमर्यादा | : | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत<br>(परंतु उमेदवाराच्या वयाचे ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत त्यांचा किमान ११ महिन्याचा सेवा कालावधी पूर्ण होणे आवश्यक आहे. ) |
| आवश्यक शैक्षणिक अर्हता | : | १) भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषदेच्या मान्यता प्राप्त विद्यापीठातून/महाविद्यालयातून बी.ए.एम.एस. पदवीधारक असावा.<br>२) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन (MCIM) चे नोंदणी (रजिस्ट्रेशन) आवश्यक.<br>३) एम.एम.पी.ॲक्ट १९६१ मधील भाग अे, अे-१, बी, किंवा सी अर्हता आवश्यक.<br>४) संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहिण्यास, बोलण्यास व वाचण्यास उमेदवार समर्थ असला पाहिजे. |
| प्राधान्य | : | १) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली पदव्युत्तर पदवी धारण केलेल्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br>२) शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर अपघात विभागात १ वर्षापेक्षा जास्त अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य राहील. |
| मानधन | : | प्रतिमाह मानधन रुपये ५०,०००/- ( या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.) तसेच मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

# इतर नियम, अटी व शर्ती

| | | | |
|---|---|---|---|
| इतर अटी | | १ | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून किंवा बदलीने नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिन्यांच्या कालावधीनंतर किंवा वयाचे ६५ वर्ष यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | | २ | उमेदवाराने वयाची ६५ वर्ष पूर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ३ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | | ४ | सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ५ | नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या पंचकर्म वैद्य/अपघात वैद्यकीय अधिका-याप्रमाणेच उमेदवारास पदाची कर्तव्य आणि जबाबदा-या पार पाडाव्या लागतील व त्यांच्याप्रमाणेच कामाचे तास राहतील तसेच त्यांना प्राप्त होणारे कागदपत्र/माहिती, इतर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे उमेदवारास आवश्यक राहील. |
| | | ६ | कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार निवासी वैद्यकीय अधिकारी व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील. |
| | | | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास नियमानुसार नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | | ७ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, म.आ.पोदार रुग्णालय,वरळी,मुंबई यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा/तीचा राजीनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| | | ८ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा निवासी वैद्यकीय अधिकारी व अधिष्ठाता यांच्याकडून नियमितपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारांच्या नियुक्त्या पूर्वसूचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ९ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | | | कंत्राटी पध्दतीवरील उमेदवारास कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. |
| | | १० | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ११ | नियमित नियुक्त आणि कार्यरत पंचकर्म वैद्य/अपघात वैद्यकीय अधिका-याप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण /कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशांचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील. |
| | | १२ | बिगर सेवानिवृत्त गटातून कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेदवारांना पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाही. |
| | | १३ | अ)कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही.तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी / सेवा निवृत्तीच्या लाभासाठी विचारात /ग्राहय धरला जाणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.<br>आ)शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही अशा आशयाचे बंधपत्रा सादर करणे आवश्यक राहील.<br>इ)कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणा-या उमेदवारांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| | | १४ | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| | | १५ | उमेदवार अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवारांची निवड झाल्यास रुजू होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश सोबत असणे आवश्यक राहील. |
| | | १६ | सदर पदाचे मानधन हे प्राप्त अनुदानातून अदा करण्यात येत असल्याने अनुदान उपलब्ध |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | होईपर्यंत विलंब होऊ शकतो. त्यासाठी उमेदवारास कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| | | १७ | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तिय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. |
| | | १८ | उमेदवारांनी मुलाखतीस येताना आवश्यक त्या सर्व संबंधित मूळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती तसेच अनुभव प्रमाणपत्र, मूळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. |
| | | १९ | कंत्राटी पध्दतीवरील अपघात वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्त उमेदवारांना Shift Duties (Morning/ Evening/ Night) मध्ये काम करणे अनिवार्य राहील. |
| | | २० | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अपघात वैद्यकीय अधिकाऱ्यांना अपघात विभागातील कामकाजासंबंधित न्यायवैद्यकीय प्रकरणे उपलब्ध झाल्यास न्यायालयात साक्षकामी हजर राहणे अनिवार्य आहे. |
| | | २१ | पात्र उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा. |

तरी सदर पदाकरीता इच्छुक व पात्र उमेदवारांनी www.mahaayush.gov.in व www.ayurvedinstitute.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या माहिती नुसार विहित नमुन्यातील अर्ज भरुन आवश्यक मूळ प्रमाणपत्रांच्या दोन स्वसाक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता, म.आ.पोदार रुग्णालय, वरळी, मुंबई येथे प्रत्यक्ष मुलाखतीच्या (Walk in Interview) दिवशी दिनांक ०४.०४.२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता उपस्थित रहावे.

अधिष्ठाता,
म.आ.पोदार रुग्णालय,वरळी,मुंबई

# परिशिष्ट "अ"

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वत: स्वाक्षरी करावी.

अर्जाचा नमुना
महाराष्ट्र शासन
**म.आ.पोदार रुग्णालय,वरळी,मुंबई**

प्रति,
मा.अधिष्ठाता,
म.आ.पोदार रुग्णालय,
वरळी,मुंबई ४०० ०१८.

विषय:- आपल्या रुग्णालयातील ........................................................................ या पदावर कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्यांच्या कालाधीसाठी नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत.

संदर्भ:-आपली जाहिरात दिनांक ...............................................................

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या रुग्णालयातील पंचकर्म वैद्य (स्त्री) / अपघात वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्यांच्या कालावधीकरीता जाहिरातीमध्ये नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | : | आडनाव | स्वत:चे नाव | वडिलांचे/पतीचे नाव |
| | | | | | |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह | | | | |
| ३) | दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | |
| ४) | ई – मेल | : | | | |
| ५) | जन्मदिनांक (अंकी व अक्षरी) | : | | | |
| ६) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय | : | वर्ष | महिने | दिवस |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | राष्ट्रीयत्व | : | |

८) शैक्षणिक अर्हता – माध्यमिक/उच्च माध्यमिक परिक्षा /पदवी/ पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्राबाबत नमूद करावे. तसेच शाळा /महाविद्यालय सोडल्याचा दाखला व सर्व वर्षाच्या स्वसाक्षांकित गुणपत्रिका / प्रमाणपत्र सोबत जोडाव्यात.

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | एस.एस.सी. | | | |
| २. | एच.एस.सी. | | | |
| ३. | बी.ए.एम.एस. | | | |
| ४. | एम.डी. (विषय: ) | | | |
| ५. | पी.एच.डी. | | | |
| ६. | अन्य | | | |

९) अवगत असणा-या भाषा : (योग्य ठिकाणी ( ✓ ) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१०) कामाचा अनुभव: (प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी (दि...... ते दि. ....... ) (वर्ष/ महिने /दिवस) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ६ | | | |
| ७ | | | |

११) Ph.D आहात का ?

१२) पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशिल (प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडण्यात याव्यात.)

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

# परिशिष्ट "ब"

प्रतिज्ञापत्र

मी श्री/ श्रीमती ............................................................................ प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती पूर्णत: खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रदद करण्यात येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रदद होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

# परिशिष्ट "क"

**शपथपत्र**

मी श्री/श्रीमती ........................................................................................ प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, जाहिरातीत नमूद अटी व शर्तींचे पालन करुन, कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही. तसेच शासन / सक्षम प्राधिकरण /कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश /आदेशाचे पालन करीन.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)

## परिशिष्ट – "ड"

## ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वैद्य /वैद्या ..................................................या रुग्णालयात दिनांक ........................ पासून ..................... पर्यंत या पदावर कार्यरत आहेत. वैद्य /वैद्या ............................................. यांची म.आ.पोदार रुग्णालय, वरळी, मुंबई येथे पंचकर्म वैद्य (स्त्री) / अपघात वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झाल्यास रुग्णालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस रुग्णालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

सही

संस्थेचा शिक्का

प्राचार्य /अधिष्ठाता/संस्थाप्रमुख
(संपूर्ण नाव व पदनाम)

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी

(स्वसाक्षांकित सत्यप्रती)

| Sr.no. | Document Name | जोडले आहे / नाही |
|---|---|---|
| 01 | Aadhar card / Pan Card | |
| 02 | SSC Passing Certificate (For D.O.B.) @ T.C. (any one) | |
| 03 | Nationality /Domicile Certificate | |
| 04 | BAMS 1st year to Final Year Marksheet | |
| 05 | BAMS passing Certificate | |
| 06 | Internship Completion Cetificate | |
| 07 | BAMS Degree Certificate | |
| 08 | PG Degree Certificate / Passing Certificate | |
| 09 | Registration Certificate of State Council | |
| 10 | MS-CIT or Equivalent Qualification | |
| 11 | Experience Certificate | |
| 12 | No Objection Certificate from current institute | |
| 13 | Additional qualification in concern subject if any (Ph.D.) (if applicable) | |
| 14 | Participation in National /International CME / Conference/Seminar / Paper Presentation etc. | |
| 15 | Special Awards | |

उमेदवाराची स्वाक्षरी

(संपूर्ण नावासहित)

| | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल | |
|---|---|---|
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| | ६. | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |
| | ११. | |
| | १२. | |
| | १३. | |
| | १४. | |
| | १५. | |
| | १६. | |
| | १७. | |
| | १८. | |
| | १९. | |
| | २०. | |
| | २१. | |
| | २२. | |
| | २३. | |
| | २४. | |

परिशिष्ट "ब" व "क" तील प्रतिज्ञापत्रे एकाच १०० रुपयाच्या बंधपत्रावर देण्यांत यावी.

उमेदवाराची स्वाक्षरी
(संपूर्ण नावासहित)